राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना
सोसायटीस अधिकार प्रदान करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग,
शासन निर्णय क्र. रागांयो- २०१०/प्र.क्र.२४०/आरोग्य-६
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ ,
दिनांक :- १३ जुलै , २०११

वाचा:-

१) शासन निर्णय क्र. सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.दाकुआ- २०१०/प्र.क्र.७७/ आरोग्य-६, दि. ५ एप्रिल, २०१०
२) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.रागांयो-२०१४/प्र.क्र. २०३/ आरोग्य-६, दि. २१ जून, २०१०
३) शासन निर्णय क्र. सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.दाकुआ- २०१०/प्र.क्र.७७/ आरोग्य-६, दि. १६ जुलै, २०१०
४) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र. रागांयो- १३१०/प्र.क्र. २७२/आरोग्य-६, दि. २६ ऑगस्ट, २०१०
५) मंत्रीमंडळाचे सचिव यांचे दिनांक २ मे, २०११ चे पृष्ठांकन (मंत्रीमंडळ बैठक दि. २१ एप्रिल, २०११, विषय क्र. २, कार्यवृत्त)
६) शासन निर्णय क्र. रागांयो- २०१०/प्र.क्र.२४०/आरोग्य-६, दि. ३१ मे , २०११

प्रस्तावना :- महाराष्ट्र राज्यातील दारिद्र्य रेषेखालील व दारिद्र्य रेषेवरील कुटुंबांसाठी विमा कंपनीच्या सहभागाने राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सुरु करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. त्या अनुषंगाने राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सोसायटीस अधिकार प्रदान करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :- महाराष्ट्र राज्यातील दारिद्र्य रेषेखालील व दारिद्र्य रेषेवरील कुटुंबांसाठी विमा कंपनीच्या सहभागाने राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेची अंमलबजावणी मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सोसायटी मार्फत करण्यात येईल. सदर सोसायटीस खालील प्रमाणे अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.

१. राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेची अंमलबजावणी करण्याकरिता, मंत्रीमंडळाने मान्यता दिलेल्या प्रीमियमचे दर निश्चित करणे, विमा कंपनीची निवड करण्यासाठी व रुग्णालयांची निवड करण्यासाठी निकष निश्चित करणे व निकषांनुसार निविदाद्वारे विमा कंपनीची व रुग्णालयांची निवड करणे व त्यांचेशी करार (M.O.U.) करणे
२. योजनेच्या अंमलबजावणीसाठी सोसायटीची तीन महिन्यातून किमान एक आढावा बैठक आयोजित करणे

३. योजनेच्या अंमलबजावणीसाठी कंत्राटी पध्दतीने कर्मचारी वर्गाची नियुक्ती करणे, योजनेमध्ये सोसायटीने नियुक्त केलेल्या व शासनाने नियुक्त केलेल्या कर्मचारी व अधिका-यांचे वेतन सोसायटीच्या निधीतून अदा करणे.

४. योजनेतील लाभार्थ्यांवर झालेल्या शस्त्रक्रिया व उपचारांवरील खर्चाच्या विमा कंपनीमार्फत सादर केलेल्या देयकांना अंतिम मान्यता देणे.

५. सोसायटीच्या कार्यालयासाठी अध्यक्षांच्या मान्यतेने आवश्यक साधनसामुग्रीची खरेदी करणे.

६. सोसायटीच्या लेख्यांची भारताचे नियंत्रक व महालेखापाल (C.A.G) मार्फत दरवर्षी लेखा तपासणी करणे.

७. सोसायटीच्या दर वर्षाच्या लेखा तपासणी अहवाल शासनास सादर करणे.

८. योजनेवर झालेल्या खर्चाचा ताळमेळ घालून विमा कंपनीचा कार्य कालावधी संपुष्टात आल्यानंतर उर्वरित रकमा शासनखाती जमा करणे.

९. शासनाकडून अथवा विमा कंपनीकडून प्राप्त होणा-या रकमा शासनाच्या परवानगीशिवाय शासकीय लेख्याव्यतिरिक्त इतरत्र जमा करता येणार नाहीत. तथापि सोसायटीच्या दैनंदिन आर्थिक व्यवहारांसाठी राष्ट्रीयकृत बँकेमध्ये सोसायटीच्या नावे खाते उघडता येईल.

१०. योजनेच्या अंमलबजावणीसाठी (प्रि-ऑथरॉयझेशन,क्लेम्स तक्रारी इ. बाबींसाठी) वैद्यकीय अधिका-यांची नियुक्ती कंत्राटी पध्दतीने करणे.

११. रुग्णालयांनी आयोजित केलेल्या आरोग्य शिबिरांच्या खर्चाप्रित्यर्थ सहाय्य म्हणून प्रत्येक रुग्णालयास प्रत्येक शिबिरासाठी आवश्यक आर्थिक सहाय्य मंजूर करणे.

१२. योजनेमध्ये समाविष्ट करावयाचे किंवा कमी करावयाचे आजार व प्रोसिजर्सना शासनाची मान्यता घेणे.

१३. सोसायटीच्या नियामक परिषदेवर सदस्य नियुक्तीचे व सदस्य कमी करावयाचे अधिकार सोसायटीच्या अध्यक्षांना राहतील.

१४. योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने किंवा इतर बाबीमुळे उद्भवणा-या न्यायालयीन व तत्सम प्रकरणी आवश्यक ती कार्यवाही करण्याची जबाबदारी सोसायटीची राहील.

१५. योजनेच्या अनुषंगाने अत्यंत महत्वाचा निर्णय तातडीने घ्यावयाचा असल्यास तसा निर्णय घेण्याचा अधिकार सोसायटीस असणे तथापि सदर निर्णय शक्य तितक्या लवकर शासनाच्या मान्यतेसाठी सादर करणे.

१६. सोसायटीची मालमत्ता व निधी अंतिमत: शासनाच्या मालकीची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(भूषण गगराणी)
सचिव

प्रत,

मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई

एच-२०११-१३

D:Rajiv G GR 1st may1

मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय मुंबई
मा. उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. मंत्री. आरोग्य यांचे खाजगी सचिव.मंत्रालय, मुंबई
मा.मंत्री, वित्त व नियोजन यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई
मा. मंत्री. विधि व न्याय यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. राज्यमंत्री, आरोग्य यांचे खाजगी सचिव.मंत्रालय, मुंबई
मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
अपर मुख्य सचिव. महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, वित्त, विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव-२, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव. माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, अन्न व नागरी पुरवठा विभाग, मंत्रालय, मुंबई
मुख्य कार्यकारी अधिकारी, राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना, मुंबई
संचालक, आरोग्य सेवा, मुंबई
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई
सह सचिव / उप सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
सार्वजनिक आरोग्य विभाग (सर्व कार्यासने व शाखा) मंत्रालय, मुंबई -३२
निवड नस्ती.

-------